





दैनिक

महाराष्ट्राचा बुलंद आवाज • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■








•बीड(महाराष्ट्र) •वर्ष ५ वे •अंक १४८ •गुरूवार, दि. २८ ऑगस्ट २०२५ •RNI-MAHMAR/2021/80074 •Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 •पान १ •पाने ४ •किंमत ३ रूपये

• dailymarathwadapatra2021@gmail.com • https://marathwadapatra.com • https://epaper.marathwadapatra.com • Mo. 9822152955


# करोडो मराठा समाज मुंबईच्या दिशेने; सरकारची पाचावरधारण

## आरक्षण घेतल्याशिवाय माघार नाही; मुंबईत मला गोळ्या घाला: जरांगे पाटील







**बीड । प्रतिनिधी**

मराठा आरक्षणासाठी आक्रमक झालेले मनोज जरांगे पाटील हे मुंबईच्या दिशेने निघाले आहेत. ते मुंबईत येऊन आझाद मैदानात बेमुदत उपोषणाला बसणार आहेत. मुंबईत एकीकडे गणेशोत्सवाची धूम चालू आहे. असे असतानाच जरांगे यांच्या या भूमिकेमुळे सरकार कात्रीत सापडले आहे. मुंबई उच्च न्यायालयानेही त्यांना मुंबईत येण्यास मनाई केली होती. दरम्यान, आता त्यांना आझाद मैदानात आंदोलन करण्याची परवानगी मिळाली आहे. पण ही परवानगी देताना एकूण आठ आटी घालण्यात आल्या आहेत. यापैकी एका अटीने तर मोठी अडचण निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे आता काय होणार? याकडे सर्वांचेच लक्ष लागले आहे.

आझाद मैदानात आंदोलन करता येईल, पण मनोज जरांगे यांना मुंबईतील आझाद मैदानात आंदोलन करण्याची परवानगी मिळाली आहे. जरांगे यांनी मुंबईत येऊन बेमुदत आंदोलन करण्याची भूमिका घेतलेली असली तरी त्यांना फक्त एका दिवसासांठीच आझाद मैदानात आंदोलन करता येईल, असे परवानगीच्या पत्रात म्हणण्यात आले आहे. तसेच ही परवानगी देताना इतर आठ अटी घालण्यात आल्या आहेत.

### • जरांगे यांच्यापुढे नेमक्या कोणत्या अटी आहेत?

- जरांगे यांच्या आंदोलनासाठी एकूण आठ अटी घालण्यात आल्या आहेत. यातील पहिली अट म्हणजे त्यांच्या आंदोलनास एका वेळी फक्त एका दिवसासाठी परवनागी देण्यात आली आहेत. शनीवार, रविवार तसेच शासकीय सुट्‌ट्यांच्या दिवशी कोणत्याही परवानग्या देण्यात येणार नाहीत.
- या आंदोलनादरम्यान, ठराविक वाहनांना परवानगी देण्यात आलेली असून वाहनतळासाठी वाहतूक पोलीसांशी विचारविनिमय करुन परवानगी देण्यात येईल. तसेच आपली वाहने मुंबईत प्रवेश केल्यानंतर ईस्टर्न फ्री वे या रस्त्याने वाडीबंदर जंक्शनपर्यंत येतील. त्यापुढे मुख्य आंदोलकासोबत फक्त ५ वाहने आझाद मैदान येथे जातील व इतर सर्व वाहने ही वाडीबंदर येथून पोलीसांनी निर्देशित केलेल्या शिवडी, ए शेड व कॉटनग्रीन परिसरात थेट नियोजित ठिकाणी पार्कंगकरिता नेण्यात यावीत.
- आंदोलकांची कमाल संख्या पाच हजार ही पाळणे बंधनकारक आहे. ▶▶ उर्वरित पान २ वर

### • कोणती अट ठरणार अडचणीची?

**मनोज जरांगे यांना घालून दिलेल्या अटींपैकी सहाव्या क्रमांकाची अट अडचणीची ठरू शकते. कारण सहाव्या अटीनुसार जरांगे यांना सकाळी नऊ ते सायंकाळी सहा वाजेपर्यंतच आंदोलन करता येणार आहे. त्यानंतर त्यांना आझाद मैदानात थांबता येणार नाही. तसेच या मैदानाची क्षमता फक्त ५००० एवढीच आहे. तर जारांगे यांच्या समर्थनार्थ आझाद मैदानावर मोठी गर्दी होण्याची शक्यता आहे. ही शक्यता खरी ठरल्यास सायंकाळी सहा वाजल्यानंतर आझाद मैदानावरील गर्दीचे काय होणार? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. त्यामुळे आता सरकार या अडचणीवर कोणता तोडगा काढणार? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.**



*गणपती बप्पा मोरया! गणपती बप्पाचे घरोघरी आगमन.... दैनिक मराठवाडा पत्र कार्यालयात भक्तीभावाने संपादक दत्तात्रय नरनाळे यांनी सहकुंटूंब श्रींची प्रतिष्ठापणा केली.*

# बशीरगंज भागात व्यवसायिक इमारत बांधकामात पार्किंग नियमांची पायमल्ली

## नगरपालिकेचे दुर्लक्ष ; बेसमिट पार्किंगला व्यवसाय गाळ्याची निर्मिती !

**बीड । प्रतिनिधी**

बांधकाम करताना पार्किंगचे नियम हे बांधकाम कोणत्या प्रकारचे आहे (निवासी, व्यावसायिक), जागेचे क्षेत्र आणि राष्ट्रीय इमारत संहिता यावर अवलंबून असतात. सामान्यतः, प्रत्येक निवासी युनिटला पुरेशी पार्किंगची जागा असणे आवश्यक आहे. व्यावसायिक प्रकल्पांसाठी, इमारतीच्या क्षेत्रफळानुसार (उदा. चौरस मीटर) पार्किंगची आवश्यकता ठरवली जाते. इलेक्ट्रिक वाहनांसाठी चार्जिंग स्टेशन्सची तरतूद करणे आवश्यक आहे. बीड शहरात बहुतांश भागात व्यावसायिक बांधकाम सह सदनिका बांधकामांना पार्किंगची व्यवस्था नियमानुसार ठेवली जात नसल्याचे चित्र आहे.



विशेष म्हणजे बशीरगंज भागात एका नवीन इमारतीचे काम सुरू आहे. ही इमारत व्यवसायिक इमारतीमध्ये येत असल्याने या इमारतीला पार्किंगची व्यवस्था करणे आवश्यक असताना बांधकाम व्यवसायाने बेसमेंट केले असून या ठिकाणी पार्किंग व्यवस्था करण्यात आली नसून व्यवसायिक गाळे उभे करण्यात येत आहे. या ठिकाणी अगोदरच पार्किंगची समस्या ▶▶ उर्वरित पान २ वर

### • माहिती घेऊन कारवाई करणार : मुख्याधिकारी

**पार्किंग नियमांचे अंमलबजावणी करण्यासंदर्भात मुख्याधिकारी नगरपालिका बीड यांच्याशी संपर्क केला असता त्यांनी नगररचना विभागाकडून माहिती घेऊन यावर पुढील कारवाई करणार असल्याचे म्हटले आहे. नगरपालिका हद्दीत अनेक ठिकाणी गृहनिर्माण संस्था तसेच खाजगी बिल्डर कडून सदनिका बांधण्यात येत आहेत या ठिकाणीही नियमानुसार पार्किंगची व्यवस्था करण्यात येत असल्याचे चित्र आहे तर शहरात अनेक ठिकाणी व्यावसायिक बांधकाम करताना बेसमेंट मध्ये पार्किंग ठेवणे आवश्यक असतानाही फक्त कागदोपत्री पार्किंग दाखवत या ठिकाणीही व्यवसायिक गाळे भाड्याने दिले जात असल्याचे चित्र आहे. मुख्याधिकारी शैलेश फडके यांनी या सर्व प्रकरणाची माहिती घेत कारवाई करणार असल्याचे आश्वासन दिले आहे.**

# धनंजय मुंडेंच्या नाथ प्रतिष्ठानच्या वैद्यनाथ गणेशोत्सवास सुरुवात

- ज्येष्ठ व्यापारी बंडू गरड यांच्या हस्ते सपत्नीक पूजन करून श्रींची स्थापना
- संत ज्ञानेश्वर माऊली संजीवन समाधी सोहळ्याच्या देखाव्याचे धनंजय मुंडे यांच्या उपस्थितीत उद्घाटन



**परळी वै.। प्रतिनिधी**

धनंजय मुंडे अध्यक्ष असलेल्या नाथ प्रतिष्ठान या सामाजिक संस्थेच्या वतीने आयोजित श्री वैद्यनाथ सार्वजनिक गणेशोत्सवास आज साध्या पद्धतीने सुरुवात झाली. यावेळी परळी शहरातील ज्येष्ठ व्यापारी बंडू गरड यांच्या हस्ते सपत्नीक पूजन करून श्रींची स्थापना करण्यात आली. धनंजय मुंडे यांच्या संकल्पनेतून व युवक नेते अजय मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली यावर्षी नाथ प्रतिष्ठानच्या वतीने संत ज्ञानेश्वर माऊली संजीवन समाधी सोहळा, रेड्या मुखी वेद बोलविलेला प्रसंग, चांगदेव व माऊली आणि भावंडांची ▶ उर्वरित पान २ वर

# मुख्यमंत्री रोजगार योजनेत दोन कोटी 51 लाखांचा गैरव्यवहार उघड !

## खोट्या कागदपत्रांच्या आधारे शासकीय अनुदानाचा अपहार ; सायबर पोलिसांची शिताफीने कारवाई

**बीड । प्रतिनिधी**

मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम (CMEGP) योजनेअंतर्गत खोटे दस्तऐवज तयार करून तब्बल दोन कोटी एक्कावन लाख एक्कावन हजार सहाशे ब्याण्णव रुपयांचा शासकीय अनुदानाचा अपहार केल्याचा धक्कादायक प्रकार उघड झाला आहे. या प्रकरणी मुख्य आरोपी गोपाल बब्रुवान लोखंडे, राहणार संजय नगर, गेवराई याला बीड सायबर पोलिसांनी अटक केली असून इतर सहा आरोपींचा या प्रकरणात सहभाग असल्याचे निष्पन्न झाले आहे.

तक्रारदार बाळासाहेब त्रिबंक यशवंते, वय ५४ वर्षे, व्यवसाय




शासकीय नोकरी, पद उद्योग सहसंचालक, विभागीय कार्यालय छत्रपती संभाजीनगर यांनी दिनांक १ जुलै २०२४ रोजी बीड शहर पोलीस स्टेशन येथे तक्रार दाखल केली होती. यामध्ये त्यांनी नमूद केले की महाराष्ट्र शासन उद्योग कामगार विभागामार्फत २०१९-२० या आर्थिक वर्षापासून सीएम रोजगार निर्मिती कार्यक्रम योजना सुरू करण्यात आली होती. या योजनेतून शहरी व ग्रामीण भागातील सुशिक्षित युवक-युवतींना बँक कर्ज आणि अनुदानाच्या माध्यमातून व्यवसाय सुरू करण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली होती. योजनेतील संपूर्ण प्रक्रिया ऑनलाईन ठेवण्यात आली होती. मात्र ▶▶ उर्वरित पान २ वर

# जिल्ह्यात घरोघरी गणपती बाप्पा विराजले



**बीड । प्रतिनिधी**

अखंड विश्वाचा दु:खहर्ता आणि भूतलावरील जिवांचा सुखकर्ता गणपती बाप्पा यांचे आज ढोल-ताश्याच्या गजरात गुलालाची उधळण करत घराघरामध्ये स्वागत करण्यात आले असून मोठ्या भक्तीभावाने गणरायाची प्रतिष्ठापणा घराघरामध्ये केल्याचे पहावयास मिळत आहे. सार्वजनिक गणेश मंडळांनीही मोठ्या उत्साहात गणरायाला मंडळस्थळी नेत भक्तीभावाने श्रीची प्रतिष्ठापणा केली. श्रीगणेश चतुर्थीच्या अनुषंगाने राज्यभरात आनंदाचे वातावरण असून दहा दिवस गणराया आपल्या घरात विराजमान असल्याचा आनंद प्रत्येक भक्ताच्या चेहऱ्यावर पहावयास मिळत आहे. श्रीगणेशाच्या आगमनानिमित्त स्वागतासाठी जिल्ह्यातल्या घराघरांमध्ये दारी रांगोळी, तोरण बांधण्यात आल्याचे पहावयास मिळाले. गणरायाला मोठ्या ▶▶ उर्वरित पान २ वर



## स्वराज्य सरपंच सेना महाराष्ट्र राज्य सेवा पुरस्कार संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील जरूड गावचा राजेश राम चंद्र काकडे यांचा ही गुण गौरव करण्यात आला आहे राजेश काकडे यांनी दुष्काळी भागावर मात करण्यासाठी आपल्या बायकोचे दागिने मोडुन दोन बोअरवेल घेतले आहेत आणि त्या दोन बोअरवेल ला खुप पाणी लागले असुन दोन्ही बोअरवेल राजेश ने गावा करीता बहाल केले असुन मागील दुष्काळात ▶ उर्वरित पान २ वर





# गणेशोत्सव : परंपरा, एकात्मता आणि महाराष्ट्राची सांस्कृतिक ओळख



महाराष्ट्र सरकारने नुकताच एक ऐतिहासिक निर्णय घेत सार्वजनिक गणेशोत्सवाला राज्य उत्सवाचा दर्जा दिला आहे . सांस्कृतिक कार्य मंत्री आशीष शेलार यांनी विधानसभेत ही घोषणा करताना गणेशोत्सव हा महाराष्ट्राच्या आत्म्याचा उत्सव आहे असे प्रतिपादन केले . हा शासन निर्णय केवळ औपचारिकता नाही , तर लोकमान्य टिळकांच्या सामाजिक दृष्टीकोनाला सलाम करणारा , परंपरेला मान्यता देणारा आणि भविष्यातील पिढ्यांना दिशा दाखवणारा आहे .

इतिहासाच्या पाऊलखुणा : गणपती ही बुद्धी , विद्या , समृद्धीची देवता . वैदिक काळापासून गणेशोपासना अस्तित्वात आहे . परंतु १८९३ मध्ये लोकमान्य टिळकांनी गणेशोत्सवाला सार्वजनिक स्वरूप दिले आणि ब्रिटिशांच्या विरोधात समाज एकत्र येण्याचे माध्यम निर्माण केले . गल्ल्या , वाडे , मोहल्ले एकत्र आले आणि गणपती बाप्पा मोरयाच्या घोषणांनी इंग्रजांविरुद्ध लढ्याला जनाधार दिला .

महाराष्ट्रातील परंपरा : महाराष्ट्रात गणेशोत्सव म्हणजे भक्ती , संस्कृती , समाजसेवा आणि लोकसहभाग यांचा संगम . पुण्यातील दगडूशेठ हलवाई गणपतीपासून मुंबईतील लालबागचा राजापर्यंत असंख्य मंडळे आपल्या कलात्मक मांडणी , सामाजिक उपक्रम आणि धार्मिक वातावरणासाठी प्रसिद्ध आहेत . लोकमान्य टिळकांनी घडवलेला हा उत्सव आज गल्लोगल्लीतील बाप्पा म्हणून महाराष्ट्राच्या प्रत्येक कोपऱ्यात पोचला आहे .

महाराष्ट्रातील गणेश उपासनेत अष्टविनायक यात्रा विशेष मानली जाते . पुणे जिल्ह्यातील आठ प्राचीन गणेश मंदिरे – मुरुडचे मोरेश्वर , सिद्धटेकचे सिद्धिविनायक , ओझरचा विघ्नहर , लेण्याद्रीचा गिरिजात्मक , रांजणगावचा महागणपती , थेऊरचा चिंतामणी , पालीचा बल्लाळेश्वर आणि महडचा वरदविनायक – या सर्वांना एकत्र भेट देणे ही यात्रा पूर्ण मानली जाते . भक्त आपली मनोकामना पूर्ण करण्यासाठी आणि गणरायाच्या कृपेचा लाभ घेण्यासाठी ही यात्रा करतात . त्यामुळे अष्टविनायक ही गणेशभक्तीची अनोखी परंपरा आहे . ओव्या अजूनही आपल्याला भूतकाळाशी जोडतात –

गणराया गणपती देवा
तुझ्या चरणी माथा ठेवा
मंगलमुर्ती मोरया रे
दूर करो संकट सारे .

भारत आणि जगातील गणेशोत्सव : आज गणेशोत्सव केवळ महाराष्ट्रापुरता मर्यादित नाही . गोवा , कर्नाटक , आंध्र प्रदेश , तेलंगणा इथून तो दक्षिण भारतात विस्तारला . उत्तर भारतात दिल्ली , मध्य प्रदेशात जबलपूर आणि इंदूर येथे मोठ्या उत्साहाने गणेशोत्सव होतो . परदेशातही भारतीय समाजाने हा उत्सव रूजवला आहे . लंडन , दुबई , सिंगापूर , अमेरिकेतील न्यू जर्सी व कॅलिफोर्निया , ऑस्ट्रेलिया , कॅनडा येथे दरवर्षी गणेशोत्सव साजरा केला जातो . परदेशातील गणेशोत्सव परदेशात राहणाऱ्या भारतीयांसाठी एक ओळखीचे घर बनतो .

गणेशोत्सव आणि समाजसेवा : गणेशोत्सव केवळ धार्मिक विधी नाही , तर विधायक कामांचे व्यासपीठ आहे . अनेक मंडळे रक्तदान शिबिरे , आरोग्य शिबिरे , वृक्षारोपण , शैक्षणिक मदत , आपत्तीतील मदतकार्य अशी उपक्रम राबवतात . गणेशोत्सव हा लोकांना फक्त साजरा नाही , तर समाजासाठी काही देणगी दे हे स्मरण करून देतो .

गणेशोत्सव आणि एकात्मता : गणेशोत्सव हिंदू–मुस्लीम एकतेचा सेतू ठरला आहे . इतिहासात अनेक मंडळांच्या मिरवणुकांमध्ये सर्व धर्मीय सहभागी झाले . डोलताशे , लेझीम , भजन–कीर्तन , नृत्य , कलाविष्कार – सर्वांनी मिळून गणपतीला लोकोत्सव बनवले . तो फक्त धार्मिक नव्हे तर सामाजिक–सांस्कृतिक संगम आहे .

संगीत, गाणी आणि बाप्पा : गणेशावर आधारित असंख्य ओव्या , अभंग , गवळणी लोकजीवनात लोकप्रिय आहेत . आधुनिक काळातही बप्पावर आधारित हिंदी चित्रपट गाणी लोकप्रिय झाली – सदैव सदा गणेश गणेश, गणपती बाप्पा मोरया (अग्निपथ चित्रपट ), देवा श्री गणेशा ( अग्निपथ ), गणेश आया है ( भूतनाथ रिटर्न्स ) यासारखी गाणी आजही मिरवणुकीत दुमदुमतात . लोककला , शास्त्रीय संगीत , आणि आधुनिक बॉलिवूड – सर्वांनी मिळून बाप्पाची भक्ती अधिक रंगतदार केली आहे .

शासन निर्णयाचे महत्त्व : या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र सरकारने सार्वजनिक गणेशोत्सवाला राज्य उत्सव घोषित करणे ही केवळ परंपरेला मान्यता नव्हे तर सांस्कृतिक अस्मितेची जपणूक आहे . यामुळे मंडळांना शासकीय सुविधा मिळतील , उत्सवाची मुळे अधिक घट्ट होतील आणि जागतिक पातळीवर महाराष्ट्राची ओळख ठळक होईल .

बाप्पा हे महाराष्ट्राचे स्पंदन : गणेशोत्सव आपल्याला शिकवतो – भक्ती ही एकत्र आणणारी आहे , कला ही संस्कृतीला समृद्ध करणारी आहे आणि समाजकार्य हे खरी पूजा आहे . गणेशोत्सव हा महाराष्ट्राच्या जीवनातला श्वास आहे .

जय देव जय देव जय मंगलमूर्ती
दर्शनमात्रे मनकामना पूर्ती

गणेशोत्सव हा केवळ राज्य उत्सव नाही तर तो महाराष्ट्राच्या मनाचा उत्सव आहे , आणि आता शासनाने त्याला दिलेला मान म्हणजे परंपरेच्या मूळांना अधिक बळ देणे होय .

– चंद्रकांत सरस्वती प्रकाश शेळके
तहसीलदार, बीड

## बाप्पा तुझं येणं...



(फोटो: सौ. मनिषा प्रविण सावळे पाटील, पुणे)

पाहताच तुला बाप्पा
विसरून गेले भान,
डोळ्यातून आनंदाश्रू वाहत
शब्दांचे हरवले भान...
डोळ्यात तुझ्या आपुलकीचे
दिसतात मला भाव,
विसरून जाते देवा,
माझा मलाच लागत नाही ठाव...
रूप तुझे सुंदर
वर्णन करू तरी मी काय,
शब्दांच्या पलीकडचे सौंदर्य
तू वात्सल्याची माय...
तुझ्या येण्याच्या चाहुलीने
वेदनांचे हरवते पान,
तुझ्या दर्शनाने होते
माझे मन बेभान...
खूप काही सांगायची असते
बाप्पा माझ्या मनाची व्यथा,
तुला पाहताच विसरते
माझ्या सर्व दुखमय कथा...
बाप्पा तुझं येणं
म्हणजे माझं तुझ्यात गुंतनं
सर्व काही बाजूला सारून
माझं मला विसरणं...

– ज्योती रावराणे, कांजुरमार्ग, मुंबई

◆ पान १ वरून पुढे...

## ● जरांगे यांच्यापुढे नेम....

तसेच आझाद मैदानाचे ७००० स्कवेअर मीटर एवढेच क्षेत्र आंदोलनासाठी राखीव ठेवण्यात आलेले असून त्याची क्षमता ५००० पर्यंत आंदोलकांना सामावून घेण्याएवढीच आहे. परंतु तेथे प्रचंड मोठ्या संख्येने आंदोलक आल्यास त्यांना थांबण्यासाठी मैदानात पर्याप्त जागा उपलब्ध होणार नाही. तसेच आपले अर्जापूर्वी इतर आंदोलकांनी सुद्धा दिनांक २९/८/२०२५ रोजी आंदोलनासाठी परवानगी मागितलेली आहे. त्यांचा आंदोलनाचा हक्कसुद्धा बाधित करता येणार नाही. त्यामुळे ५००० आंदोलकांमध्ये त्यांचासुद्धा समावेश असेल. त्या आंदोलकांना मैदानातील पुरेशी जागा उपलब्ध करुन देणे बंधनकारक आहे.

- प्रतिबंधित केलेल्या क्षेत्राच्या दिशेने आणि क्षेत्राकडून मोर्चा नेला जाणार नाही.
- परवानगी घेतल्याशिवाय ध्वनीक्षेपक, सार्वजनिक प्रचार यंत्रणा किंवा गोंगाट करणारी उपकरणे यांचा वापर करता येणार नाही.
- आंदोलनाची वेळ ही सकाळी ९.००. ते सायंकाळी ६.०० याच वेळेसाठी दिलेली असून त्यानंतर आंदोलकांना मैदानात थांबता येणार नाही.
- आंदोलक कोणतेही अन्न शिजवणार नाहीत किंवा केर कचरा टाकणार नाहीत असे महत्त्वाचे नियम असून इतरसुद्धा काही नियम घालून देण्यात आलेले आहेत.
- आंदोलनाच्या कालावधीदरम्यान सार्वजनिक गणेशोत्सव हा सण मोठ्या प्रमाणात साजरा होत आहे. त्यानुसार गणेश विर्सजनादरम्यान रहदारीस कोणताही अडथळा किंवा नागरिकांना कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही किंवा धार्मिक भावना दुखावणार नाहीत याप्रकारचे आपणाकडून किंवा आपल्या आंदोलकाकडून असे कृत्य होणार नाही. तसेच आपले आंदोलन कार्यक्रमात लहान मुले, गरोदर स्त्रिया व वृद्ध व्यक्तींना सहभागी केले जाणार नाही याची दक्षता घ्यावी. अशा एकूण आठ अटी मनोज जरांगे यांना घालण्यात आल्या आहेत.

◆ पान १ वरून पुढे...

## बशीरगंज भागात...

मोठ्या प्रमाणे समोर येत आहे अनेक वेळा वाहतूक कोंडीमुळे रस्त्यावर पाय चालणे अवघड होत आहे. मुख्य बाजारपेठ शाळा व भाजी मार्केट सह विविध कार्यालय या रस्त्यावर आहेत. नवीन बांधकाम करताना नगरपालिकेच्या नगररचना विभागाने दिलेल्या पार्किंगच्या नियमांना हरताळ फासण्यात येत आहे.बांधकाम सुरू करण्यापूर्वी, विकासकांनी मंजूर आराखड्यानुसार आणि राष्ट्रीय इमारत संहितेनुसार पार्किंगची जागा निश्चित करणे आवश्यक आहे. व्यावसायिक प्रकल्प व्यावसायिक प्रकल्पांसाठी, संरक्षित क्षेत्राच्या (संचालन क्षेत्रासह) प्रति १०० चौरस मीटरसाठी पार्किंगची किमान आवश्यकता असते. बीड शहरातील नगररचना विभागाच्या बोगस कारभारामुळे शहरातील मुख्य बाजारपेठेतही बेसमेंट असलेल्या ठिकाणी पार्किंग होणे आवश्यक असताना त्या ठिकाणीही व्यवसायिक गाळे निर्मित केले जात आहे. या पार्किंग संबंधी नियमावल्याची शहरात अंमलबजावणी होत नसल्याने व्यावसायिक गाळे निर्मित करताना पार्किंगच्या नावाखाली फक्त कागदपत्र दाखवण्यात येत आहेत. याकडे नगर रचना विभाग तसेच नगरपालिकेचे मुख्याधकारी लक्ष देतील का ?

◆ पान १ वरून पुढे...

## धनंजय मुंडेंच्या...

भेट इत्यादी जीवंत देखावे साकारण्यात आले असून, या देखाव्याचे धनंजय मुंडे यांच्या उपस्थितीत परळीतील वारकरी, संत - महंत तसेच ज्येष्ठ पदाधिकारी व मान्यवरांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष ड. राजेश्वर चव्हाण, युवक नेते अजय मुंडे, गोविंदराव देशमुख, शिवाजी शिरसाट, बाजीराव भैय्या धर्माधिकारी, प्रा. मधुकर आघाव, डॉ. संतोष मुंडे, राजेंद्र सोनी, नाथ प्रतिष्ठान चे सचिव नितीन कुलकर्णी, उपाध्यक्ष शंकर कापसे पाटील, अनंत इंगळे, रवी मुळे, अय्युब भाई पठाण, अजीज कच्ची, चेतन सौंदले, महेंद्र रोडे, ड. मनजीत सुगरे, दिलीप कराड, रामेश्वर महाराज कोकाटे, भरत गुट्टे महाराज, विश्वंभर महाराज उखळीकर, प्रा. महेश मुंडे, अल्ताफ पठाण यांसह आदी उपस्थित होते.

## मुख्यमंत्री रोजगार...

आरोपींनी खोटे कागदपत्र तयार करून बँकेच्या पोर्टलचा गैरवापर केला आणि शासनाची तब्बल दोन कोटी एक्कावन लाख रुपयांची आर्थिक फसवणूक केली. तक्रारीनंतर सायबर पोलीस स्टेशन, बीड येथील पोलीस अधिकाऱ्यांनी तांत्रिक तपास सुरू करून आरोपींचा माग काढला. अखेर आज गेवराई येथून शिताफीने मुख्य आरोपी गोपाल लोखंडे यास अटक करण्यात आली. या कारवाईत पोलीस अधीक्षक बीड, अप्पर पोलीस अधीक्षक, उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक व्ही.यु. घोळवे, सहायक पोलीस निरीक्षक संदीप आराक, सहायक पोलीस निरीक्षक युनुस शेख, पोलीस हवालदार जायभाये, पंचम वडमारे, विजय घोडके, मपोशि काशिद यांच्यासह सायबर पोलीस स्टेशनच्या पथकाने सहभाग घेतला. सायबर पोलिसांनी सर्व नागरिकांना आवाहन केले आहे की ऑनलाईन पद्धतीने आर्थिक व्यवहार करताना आलेल्या फोन किंवा एसएमएसची पूर्ण खात्री करूनच व्यवहार करावेत. शंकास्पद प्रकार आढळल्यास तात्काळ सायबर पोलिसांशी संपर्क साधावा, असेही त्यांनी स्पष्ट केले आहे.

◆ पान १ वरून पुढे...

## जिल्ह्यात घरोघरी...

भक्तीभावाने घरी नेत श्रीची प्रतिष्ठापणा करण्यात आली. गणरायाची आरती करून भ३तीभावाने गणेश भ३तांनी बाप्पांच्या चरणी नतमस्तक होत आनंद साजरा केला.

## स्वराज्य सरपंच...

तब्बल त्या बोअरवेल वरून ५ पाच खेडे गाव पाणी भरून घेऊन जातात असेत त्यावर राजेश यांचा असणारा ऊस आणि डाळिंब बाग त्यांनी सोडुन दिली ओ गावकरी यांना पाणी दिले असे खुप मोठे उपक्रम राजेश राबवत असतो कधी कोणी वाट सरू असेल त्याला मदत करणे हॉस्पिटल मध्ये बेड उपलब्ध करून देणे असे अनेक प्रश्न तो सातत्यानी सोडत असतो पण राजेश आज देखील तेच काम करत आहे काल अहमदनगर जिल्ह्यात झालेल्या स्वराज सरपंच संघटने च्या वतीने राजेश ला जलदुत महाराष्ट्र राज्य सेवा पुरस्कार प्रदान करण्यात आला त्या बदल राजेश चे सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे त्याला मिळालेलं हे यश त्यानं गावकरी मंडळी यांना बहाल केले आहे या पुरस्कार साठी त्याचा सखा सोबती विनोद काकडे उपस्थित होता राजेश काकडे यांना पुढील वाटचालीस खुप खुप शुभेच्छा....

◆ पान ४ वरून पुढे...

## गणपती बाप्पा....

करण्यात आली पुढील १० दिवस गणेश भक्तांच्या उत्साहाला उधाण येणार आहे. लाडक्या गणपती बाप्पांची वाट पाहणाऱ्या भक्तांनी सकाळपासूनच बाजारपेठेत गर्दी केली. सकाळी बाप्पांची स्वारी भक्तांसोबत घरोघरी विराजमान होण्यासाठी निघाली. गणरायांचे स्वागत करण्यासाठी लहानग्यांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांनी पारंपरिक वेशभूषा परिधान केली. गणेशमूर्ती घेतल्यावर गुलाल आणि फुलांची उधळण करत बाप्पांच्या नामाचा जयघोष केला जात होता. शहरात सर्वत्र घरगुती गणेशमूर्तीची प्रतिष्ठापना जल्लोषात करण्यात आली. नेहमीप्रमाणे यंदाही घरोघरी विराजमान होणाऱ्या बाप्पांचे स्वागत ढोल-ताशांच्या गजरात करण्यात आले. आले आले हो गणराज आले म्हणत प्रत्येक जण लाडक्या दैवताला घरी घेऊन गेले. शहरातील सार्वजनिक गणेश मंडळांच्या गणेशमूर्तींचे स्वागत दुपानंतर करण्यात आले. गणेश मंडळांच्या कार्यकर्त्यांचा उत्साह दांडगा असल्याचे दिसून येत होते. सायंकाळी उशिरापर्यंत शहरातील गणेश मंडळांच्या मूर्तीचा प्राणप्रतिष्ठापना सोहळा सुरू होता. बाप्पांच्या आगमनाने शहरात नवचैतन्य संचारले होते.

पोलिसांचे चोख नियोजन- गणेशमूर्ती खरेदीसाठी भक्तांची होणारी गर्दी लक्षात घेता सर्वत्र पोलिसांचा मोठा फौजफाटा तैनात करण्यात आला होता. शहरातील मुख्य बाजारपेठेसह इतरत्र पोलिस कर्मचारी व अधिकाऱ्यांचा बंदोबस्त लावण्यात आला वाहतूक कोंडी होऊ नये, म्हणून रस्त्यावर मोठी वाहने लावण्यास मनाई करण्यात येत होती. गणपती बाप्पांचे स्वागत करण्यात दंग असलेल्या सुरक्षेसाठी पोलिसांनी चोख नियोजन केल्याचे दिसले.बाप्पांची 'सोशल' वारी- बाप्पांचे घराघरांत आणि सार्वजनिक गणेश मंडळांच्या मूर्तीचे स्वागत धूमधडाक्यात करण्यात आले. शहरातील या चैतन्यमय वातावरणात सोशल मीडियावरही बाप्पांची स्वारी ऐटीत असल्याचे दिसून आले. गणेशचतुर्थीच्या निमित्ताने सकाळपासूनच शुभेच्छांचा वर्षाव सोशल मीडियावर सुरू होता. बाप्पांच्या विविध रुपांचे फोटो शेअर केले जात होते. पारंपारिक वाद्याला पसंती- यंदा गणेश मंडळांनी पारंपरिक वाद्यांना पसंती दिल्याचे दिसून आले. शहरातील महत्वाच्या गणेश मंडळांसह तालुक्यातील इतर गणेश मंडळांनीदेखील डोलताशा पथकांना आमंत्रित करत श्रींची मिरवणूक काढली. त्यामुळे यंदा बाप्पांच्या आगमनाच्या मिरवणुकीत डीजेला फाटा देत पारंपरिक वाद्यांना पसंती देण्यात आल्याचे दिसून आले. दुपारनंतर मंडळांच्या मिरवणुकांनी शहरातील परिसर गजबजून गेला. भक्तांची झुंबड- विघ्नहर्त्याला घरी नेताना आबालवृद्धांचा उत्साह अधिक दिसून आला. दुपारी गणेशमूर्ती नेण्यासाठी भक्तांची बाजारात झुंबड उडाली होती. शहरातील मिठाईच्या दुकानात बाप्पांसाठीचा नैवेद्य खरेदी करण्यासाठी भक्तांनी गर्दी केली. जास्वंद, गुलाब, केवडा, मोगरा, शेवंती, झेंडूची फुले, दुर्वा, धूप, अगरबत्ती यासह पूजा साहित्य खरेदी करण्यासाठी देखील भक्तांची गर्दी झाली होती. गणेशोत्सावाच्या खरेदीसाठी भक्तांच्या तुफान गर्दीने शहरातील बाजारपेठांचे रस्ते फुलले होते.

## आष्टी येथे...

कामकाज करावं लागत होते.आष्टीत न्यायालय उभारण्यात येत असल्यामुळे आता स्थानिकांचा वेळ,पैसा आणि श्रम वाचणार आहेत.तसेच या न्यायालयासाठी एकूण २५ पदांना मान्यता देण्यात आली आहे.सदर निर्णयामुळे आष्टी तालुक्यातील प्रलंबित प्रकरणांच्या निवारण प्रक्रियेला गती मिळणार आहे.या न्यायालयाच्या निर्णयाची मंत्रिमंडळाने घोषणा करताच आष्टी तालुका वकील संघ व नागरिकांनी पेढे वाटून आनंद साजरा करत आ.सुरेश धस व राज्य शासनाचे आभार संघाने मानले.

◆ पान ४ वरून पुढे...

## ना.पंकजाताईंच्या...

मिळणे ही मोठी जबाबदारी असल्याचे गणेश लांडे म्हणाले. आमच्यावर विश्वास दाखवणारे भाजपा बीड जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, भारतीय जनता पार्टी महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, लोकनेत्या पंकजाताई मुंडे आणि प्रीतमताई मुंडे यांचे मी आभार मानतो, असेही त्यांनी सांगितले. दरम्यान, आज जाहीर झालेल्या भाजप बीड जिल्हा कार्यकारिणी व मोर्चा-आघाडी कार्यकारिणीत विविध पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली. ही निवड लोकनेत्या पंकजाताई मुंडे आणि माजी खासदार प्रीतमताई मुंडे यांच्या आदेशाने तसेच भाजपा महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आल्याचे समजते.

## मंत्रीमंडळ बैठकीत...

यांच्या माध्यमातून या बॅरेज मंजुर होवू शकला असल्याची प्रतिक्रिया आ. विजयसिंह पंडित यांनी देवून त्यांनी महायुती सरकारचे त्यांनी आभार व्यक्त केले आहेत. गेवराई सारख्या सततच्या दुष्काळग्रस्त तालुक्यात सिंचन सुविधा वाढाव्यात यासाठी जय भवानी सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अमरसिंह पंडित यांनी संधी मिळेल तेथे प्रयत्न केले. गोदावरी प्रमाणे सिंदफणा नदीपात्रात सुध्दा बारमाही पाणी असावे यासाठी त्यांनी शासन दरबारी पाठपुरावा केला. विधानसभा निवडणुकीत टाकळगाव को. प. बंधाऱ्याचे बॅरेजमध्ये रुपांतर करण्याचे आश्वासन आ. विजयसिंह पंडित यांच्या जाहिरनाम्यात देण्यात आले होते. आ. विजयसिंह पंडित यांच्या प्रयत्नांमुळे याकामी मंगळवार, दि. १ एप्रिल २०२५ रोजी झालेल्या मंत्रीमंडळ बैठकीत टाकळगाव बॅरेजच्या कामास १९.६६ कोटी रुपये अंदाजित किंमतीसाठी राज्य शासनाने प्रशासकीय मान्यता प्रदान केली होती. त्यानंतर पुढील आवश्यक कार्यवाही करून जलसंपदा विभागाने राज्य मंत्रिमंडळ बैठकीत सादर केलेल्या प्रस्तावानुसार मंगळवार दिनांक २६ ऑगस्ट रोजी टाकळगाव बॅरेजच्या कामास अंतिम मान्यता देण्यात आली आहे. या कामाच्या निविदा प्रक्रिया सुरू करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. सिंदफणा नदीवरील इतर सर्व बॅरेजची कामे सुद्धा लवकरच मंजुर होतील असा विश्वास आ. विजयसिंह पंडित यांनी व्यक्त केला आहे. टाकळगाव बॅरेजमुळे परिसरातील शेकडो एकर जमीन ओलिताखाली येणार आहे. टाकळगाव, हिरापूर, पिंपळगाव कानडा, औरंगपूर कुक्कडा, कोपरा, दगडगाव, पारगाव जप्ती, हिंगणी हवेली, नांदुर हवेली यांसह परिसरातील गावांच्या सिंचनासाठी या बॅरेजचा फायदा होणार आहे. बीड आणि गेवराई तालुक्यातील सिंदफणा नदीकाठच्या गावांनाही त्याचा लाभ होईल. मंत्रीमंडळ बैठकीत झालेल्या निर्णयानंतर गेवराई विधानसभा मतदार संघाचे आमदार विजयसिंह पंडित यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे आभार व्यक्त केले. टाकळगाव व परिसरातील ग्रामस्थांनी आनंद व्यक्त करून आ. विजयसिंह पंडित व अमरसिंह पंडित यांचे आभार मानले.

## जिव्हाळ्यातील लक्ष्मीबाई...

येथील रुग्णालया मध्ये हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने दुःखद निधन झाले आहे. दोन दिवसापूर्वी जिव्हाळा केंद्रातून त्या आपल्या मुलीकडे सणासाठी गेल्या होत्या. जाताना त्यांनी आमचा निरोप घेतला आणि सांगितले की मी आठ दिवसानंतर येणार आहे. माझी काळजी करू नका आणि आम्ही त्यांना जाण्याची परवानगी दिली. आणि आज ही दुःखद घटना घडली. त्यांच्या मुलीच्या गावी घडली. त्यांच्या पावन स्मृतीला विनम्र अभिवादन करून त्यांना जिव्हाळा परिवाराच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली पण करण्यात आली त्यांचा जातेगाव येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# मांजराचे पाणी नियोजनबध्द शेतकऱ्यांपर्यंत पोहच करू



## खा.बजरंग सोनवणे यांचे प्रतिपादन, जलपुजन कार्यक्रमाला शेतकऱ्यांची गर्दी

**बीड । प्रतिनिधी**

शेतीसाठी पाणी आवश्यक असते. यावर्षी मांजरा धरण वेळेत पुर्णक्षमतेने भरले असून भविष्यात मांजरा धरणाचे पाणी नियोजनबद्ध पद्धतीने शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी आणि परिसराच्या विकासासाठी मी सातत्याने प्रयत्नशील राहीन, असे प्रतिपादन खा.बजरंग सोनवणे यांनी केले. केज, अंबाजोगाई, धारूर, लातूर, कळंब या शहरासह ६१ गावांची तहान भागवणारे व मांजरा पट्ट्यातील पाच तालुक्यातील हजारो हेक्टर जमीन ओलिताखाली आणणारे केज तालुक्यातील धनेगाव येथील मांजरा धरण १०० टक्के भरले आहे. दि.२६ रोजी सकाळी १० वाजता खा.बजरंग सोनवणे यांच्या हस्ते जलपुजन करण्यात आले. जलपूजन प्रसंगी माजी आमदार पृथ्वीराज साठे, राजेसाहेब देशमुख, नरेंद्र काळे, प्रकल्प अधिकारी वर्ग, पंचायत समिती सदस्य, सरपंच, उपसरपंच, चेअरमन तसेच मोठ्या संख्येने शेतकरी बांधव उपस्थित होते.मांजरा धरण हे बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या आयुष्याशी, शेतीशी आणि उपजीविकेशी घट्ट जोडलेले महत्त्वाचे धरण आहे. या धरणामुळे परिसरातील हजारो हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येते. दरवर्षी शेतकऱ्यांची पिकांची आशा या धरणाच्या पाण्यावरच अवलंबून असते. यंदा धरण पूर्ण क्षमतेने ागस्ट म हिन्यातच भरल्यामुळे शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर आनंद आणि दिलासा दिसून येत आहे. मांजरा धरणाचे पाणी नियोजनबद्ध पद्धतीने शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी आणि परिसराच्या विकासासाठी मी सातत्याने प्रयत्नशील राहीन, असा विश्वास यावेळी व्यक्त केला. मांजरा धरणातून लातूर शहर, लातूर औद्योगिक वसाहत, केज, अंबाजोगाई, धारूर, कळंब या शहरासह ६१ गावे मांजरा धरणातील पाणी पुरवठ्यावर निर्भर असतात. मांजरा धरण पिण्याचे पाण्याबरोबर शेती पिकांना लागणाऱ्या पाण्यासाठी देखील महत्त्वपूर्ण आहे. धरणाच्या डाव्या व उजव्या कालव्या अंतर्गत बीड, धाराशिव आणि लातूर जिल्ह्यातील ७३ गावातील १८ हजार २२३ हेक्टर शेतजमीन सिंचनाखाली येते. डावा कालवा ९० कि.मी. अंतराचा आहे. त्यातून १०,५५९ हेक्टर शेती तर, उजवा कालवा ७८ कि.मी.चा असून त्याअंतर्गत ७६६५ हेक्टर शेती सिंचनाखाली येते. खरीप, रब्बी व उन्हाळी हंगामासाठी सरासरी १८५ दलघमी पाण्याचा वापर होते. याशिवाय केज व कळंब तालुक्यातील २७ गावातील शेतकऱ्यांना मांजरा धरणाच्या बॅकवॉटर पाण्याचा प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष लाभ होतो, अशी माहिती यावेळी अधिकाऱ्यांनी उपस्थितांना दिली.

# रमेश दादा आजबे यांच्या स्वराज ट्रॅक्टरची आष्टी तालुक्यातील शेतकऱ्यांना भुरळ

## सहा महिन्यात २०५ ची विक्रमी विक्री ; आष्टीकरांचा सावळेश्वर ट्रॅक्टर्सच्या स्वराजला ग्राहकांची पसंती

**आष्टी । प्रतिनिधी**

सावळेश्वर उद्योग समूहाचे सर्वेसर्वा रमेश दादा आजबे यांनी सावळेश्वर ट्रॅक्टर्स या नुतन शोरुम चे उद्घाटन आष्टी शहरात १९ फ ेब्रुवारी २०२५ शिवजयंतीच्या शुभमुहूर्तावर स्वराज ट्रॅक्टर चे भव्य शोरूम आष्टी शहरात धोंडे पेट्रोल पंपाच्या समोर सुरू केले. उद्घाटनावेळी १९ ट्रॅक्टर वितरित करून दिमाखात उद्घाटन केले. अवघ्या ६ महिन्यात २०५ ट्रॅक्टर विक्रीचा विक्रमी टप्पा गाठला. नुकतीच ६ महिन्यांची ट्रॅक्टर




विक्रीची आकडेवारी रमेश आजबे यांनी जाहीर केला आहे.त्यानुसार त्यांचा चांगली सुसाट ग्रोथ होणार असल्याचे स्पष्ट दिसून येत आहे. मार्केट मध्ये अनेक ट्रॅक्टर शोरुम आहेत.परंतु सावळेश्वर ट्रॅक्टर्स ने बाजारात आपले स्थान अधिक म जबूत केले आहे.त्यांनी ग्राहकांच्या अडचणी सोडून मदत करत दिलेल्या सेवेने ग्राहकांची मने जिंकली. यामुळे सावळेश्वर ट्रॅक्टर्स वरचा ग्राहकांचा विश्वास वाढला असुन ट्रॅक्टर खरेदीसाठी ग्राहक सावळेश्वरच्या स्वराज ट्रॅक्टरला मोठ्या प्रमाणावर पसंती दर्शवत आहेत.आष्टी तालुक्यातील ग्राहकांनी विश्वास दाखवत पसंती दिल्याने शेतकऱ्यांचे, तसेच सावळेश्वर ट्रॅक्टर्स टीमचे आभार रमेश दादा आजबे यांनी आभार मानले आहेत.



# शालेय वुशू स्पर्धेमध्ये संघर्ष जायभाय विभागीय स्पर्धेकरिता निवड

**बीड । प्रतिनिधी**

क्रीडा व युवक सेवा संचनालय महाराष्ट्र राज्य पुणे व जिल्हा क्रीडा कार्यालय बीड यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय वुशू स्वर्गात संपन्न झाल्या

संघर्ष जायभाय याने १९ वर्षाखाली आपल्या वजन गटामध्ये प्रथम क्रमांक मिळवून विभागीय स्पर्धेकरिता आपले स्थान निश्चित केली आहे संघर्ष जायभाय हा जिल्हा क्रीडा संकुल या ठिकाणी प्रशिक्षक उत्तरेश्वर सपाटे यांच्या मार्गदर्शना खाली सराव करत आहे

जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर सर ,डॉक्टर नितीन सोनवणे, जितू सर, राष्ट्रीय खेळाडू पवन जोगदंड या सर्वांनी संघर्ष जायभाय यास पुढील स्पर्धेकरिता शुभेच्छा दिल्या

# शारदा ज्ञानोत्सवातून ग्रामीण भागात वक्ते तयार होतील : रणवीर पंडित

## शारदा ज्ञानोत्सवातील वक्तृत्व स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

**गेवराई । प्रतिनिधी**

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा म्हणून शारदा ज्ञानोत्सवाचे आयोजन करण्यात आले असून या ज्ञानोत्सव कार्यक्रमा अंतर्गत वक्तृत्व स्पर्धेमधून गेवराई तालुक्यातील ग्रामीण भागात वक्ते तयार होतील असा विश्वास शारदा स्पोर्ट्स कडम ीचे अध्यक्ष रणवीर पंडित यांनी व्यक्त केला. जयभवानी आणि जगदंबा शिक्षण संस्थेच्या वतीने आयोजित शारदा ज्ञानोत्सवातील वक्तृत्व स्पर्धेचा शुभारंभ करताना ते बोलत होते.



जयभवानी आणि जगदंबा शिक्षण संस्थेच्या वतीने आयोजित शारदा ज्ञानोत्सवातील वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन शारदा विद्या मंदिर खळेगाव येथे करण्यात आले. यावेळी शारदा स्पोर्ट्स कडमीचे अध्यक्ष रणवीर पंडित, सामाजिक कार्यकर्ते भारत शिंदे, उपसभापती अशोक शिंदे, बाजार समितीचे संचालक पांडुरंग मुळे, मधुकर आहेर, प्रल्हाद आहेर,शेख आलम, वैजनाथ होटकर, पांडुरंग आहेर, एकनाथ आहेर, पंढरीनाथ आहेर, खुशालराव आहेर, योगीराज आहेर, बहिरे खुशाल, छडेदार कांता, कदम संजय, स्पर्धेचे परीक्षक तात्यासाहेब मेघारे, प्रा. शरद सदाफ ुले, संस्थेचे प्रशासकीय अधिकारी प्रमोद गोरकर, सहप्रशासनाधिकारी प्रा. गोगुले यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते प्रतिमा पूजन व दीप प्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. मुख्याध्यापक बी. एस. राऊत यांनी प्रास्ताविक केले.

प्राथमिक गटात स्वराज तळणकर तर माध्यमिक गटात ऋतुराज काकडे प्रथम- या स्पर्धेमध्ये जयभवानी व जगदंबा शिक्षण संस्थेच्या अंतर्गत शाळेतील १८ संघ सहभागी झाले होते. प्राथमिक गटामध्ये शिव शारदा पब्लिक स्कूल गढी च्या तळणकर स्वराज याने प्रथम, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय राक्षसभुवनच्या कु.नाटकर श्रावणी हिने द्वितीय तर शिवाजी विद्यालय मालेगावच्या कु.गंगाधर अंजली हीने तृतीय क्रमांक पटकावला. माध्यमिक गटात शारदा विद्या मंदिर गेवराईच्या काकडे ऋतुराज याने प्रथम, माध्यमिक विद्यालय शिरसदेवीच्या कु. रोमन दीक्षा हीने द्वितीय तर शारदा विद्या मंदिर खळेगावच्या कु. मडके शिवानी हीने तृतीय क्रमांक पटकावला. स्पर्धेचे परीक्षक म्हणून तात्यासाहेब मेघारे, प्रा. सदाफुले यांनी काम पाहिले. यावेळी जयभवानी आणि जगदंबा शिक्षण प्रसारक मंडळातील सर्व मुख्याध्यापक, शिक्षक, स्पर्धक विद्यार्थी आणि बहुसंख्य पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शारदा विद्यालयाच्या सर्व शिक्षकांनी परिश्रम घेतले.

# शिवणी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे जिल्हास्तरीय बास्केटबॉल क्रिडा स्पर्धेमध्ये नेत्रदिपक यश

**बीड । प्रतिनिधी**

आदर्श शिक्षण संस्था,बीड संचलित-शिवणी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय,शिवणी ता.जि.बीड विद्यालयाच्या संघाने जिल्हास्तरीय बास्केटबॉल क्रिडा स्पर्धेमध्ये नेत्रदिपक यश संपादन केले. दि.२५/०८/२०२५ रोजी पोलिस मुख्यालय, बीड ग्राऊंडवर जिल्हास्तरीय बास्केटबॉल क्रिडा स्पर्धा संपन्न झाल्या. जिल्हास्तरीय बास्केटबॉल क्रिडा स्पर्धेमध्ये शिवणी विद्यालयाच्या संघाने प्रथम क्रमांक मिळवला. शिवणी विद्यालयाच्या नेत्रदिपक यशाबद्दल लोकनेते आदरणीय श्री. जयदत्तजी (आण्णा) क्षीरसागर साहेब, युवानेते मा. श्री. रोहित (दादा) क्षीरसागर साहेब,आदर्श शिक्षण



संस्थेचे प्रशासन अधिकारी मा.डॉ. श्री.राजुजी मचाले साहेब, संस्थेचे सहाय्यक प्रशासन अधिकारी मा. श्री.योगेशजी पवार साहेब, संस्थेचे कार्यवाहक मा. श्री.राऊत सर, संस्थेचे कार्यालयीन अधिक्षक श्री.प्रकाश राठोड सर,विद्यालयाचे प्राचार्य, श्री. येडे व्ही. बी. क्रिडा शिक्षक श्री. कुटे सर, श्री.चव्हाण सर, सर्व प्राध्यापक, शिक्षक यांनी बास्केटबॉल क्रिडा स्पर्धेतील विजयी संघाचे अभिनंदन करुन पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# देगलूर येथे गोर बंजारा तिज महोत्सव उत्साहात

## मा. मुख्यमंत्री स्व. वसंतराव नाईक यांचा वारसा चालवनार : अँड मोहिनीताई नाईक

**देगलुर । प्रतिनिधी**

गोर बंजारा समाजातील म हिलाचा सर्वात मोठा सण / उत्सव म्हणजे तीज मानला जातो. या उत्सवामध्ये एका छोट्या टोपली मध्ये धान उगवले जाते आणि त्या धान चे सलग आठ दिवस पुजा केली जाते व नवव्या दिवशी त्याचे पाण्यात विसर्जन केले जाते. धान म्हणजे बंजारा समाजाची देवी अशी धारणा समाजाची आसते.



या तिज महोत्सवाला स्व. मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांचे नातू राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांच्या अर्धांगिनी अँड. मोहिनीताई इंद्रनील नाईक यांनी विशेष उपस्थित राहून समाज बांधवांना मार्गदर्शन करीत समाजाच्या ज्या काही समस्या आहेत ते सोडवण्यासाठी आम्ही सदैव तयार आहोत स्व. वसंतराव नाईक यांचा नाईक बंगला हा आपल्यासाठी सदैव खुला आहे. भाषणाच्या शेवटी संयोजक विशाल पवार व त्याच्या सहकार्याने मला आमंत्रित केले त्याबद्दल आभारही व्यक्त केले. त्यांनतर सद्गुरू सेवालाल महाराज चौक पासून ते विसर्जन घाट पर्यंत ही शोभा यात्रा म्हणजेच महोत्सव साजरा करण्यात आला असून या महोत्सवामध्ये बंजारा पारंपारिक लोकनृत्य ,बंजारा पारंपारिक लेंगी ,बंजारा हलगी (डपडा), बंजारा पारंपारिक संगीत, यांच्यासह इत्यादी पारंपारिक पद्धतीने माता - भगिनी धान ची टोपली घेऊन वाजत, गाजत, नाचत ही शोभायात्रा हजारो समाज बांधवांच्या उपस्थीत पार पडली. बंजारा समाजाच्या संस्कृतीनुसार कुमरीकेच्या डोक्यावर तिज घेत विसर्जन घाट येथे पाण्यात तिज चे विसर्जन करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी कपिल नाईक, अनिल राठोड, बालाजी जाधव, राहुल पवार,गणेश, राजु, बजरंग ,यांच्यासह अनेक गोर युवकांनी अहोरात्र मेहनत घेऊन हा कार्यक्रम यशस्वी केला त्याबद्दल संयोजकांच्या वतीने सर्व टीम आभार मानण्यात आले. कार्यक्रम ाचे सुत्रसंचलन राज पवार यांनी केले तर प्रस्ताविकेतून संयोजक विशाल पवार तालुक्यांतील तांड्याच्या ज्या समस्या त्या ताई समोर मांडत सर्वांचे आभार मांडले.

# माईलस्टोन इंटरनॅशनल स्कूल मध्ये 600 विद्यार्थांनी तयार केले मातीचे गणेश





### पर्यावरण संवर्धनासाठी कार्यशाळेचे आयोजन

**या कार्यशाळेतून विद्यार्थ्यांना पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. ६०० विद्यार्थ्यांनी यात सहभाग घेतल्याने याला अधिक स्वरूप मिळाले. विद्यार्थ्यांनीही सुंदर गणेशमूर्ती तयार केल्या. स्वत: बनवलेल्या मूर्ती ची विद्यार्थी स्थापना करणार आहेत. शिवाय घरातच एका कुंडीत विसर्जन करणार असून त्या कुंडीत एक झाड लावणार आहेत. निर्माल्याचाही खत म्हणून उपयोग करण्याचा संकल्प विद्यार्थ्यांनी केल्याने पर्यावरण संवर्धनासाठी त्यांच्यामध्ये मोठी जनजागृती होईल. - ज्ञानेश्वर तांबे, संचालक**

**बीड । प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांनी पर्यावरण पूरक गणपती उत्सव साजरा करावा, त्यांच्यात पर्यावरण जागृती निर्माण व्हावी यासाठी तळेगाव, बीड येथील माईलस्टोन इंटरनॅशनल स्कूल च्या वतीने गणेश चतुर्थी च्या पूर्व संध्येला पर्यावरण पूरक मातीचे गणपती तयार करण्याची कार्यशाळा घेण्यात आली. यामध्ये प्री प्रायमरी चे १५० आणि इयत्ता पहिली ते सातवी पर्यंतच्या ४५० अशा ६०० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवून गणपती तयार केले.

माईलस्टोन इंटरनॅशनल स्कूल च्या वतीने दरवर्षी पर्यावरण पूरक गणेशमूर्ती तयार करण्यासाठी कार्यशाळा घेतली जाते. विद्यार्थ्यांनी स्वत: गणपती तयार करुन त्याची घरी स्थापना करावी व घरीच विसर्जन करुन असा यामागचा उद्देश आहे. संचालक ज्ञानेश्वर तांबे, नम्रता तांबे, मुख्याध्यापिका सारिका जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली आशा गालफाडे यांनी या गणपती तयार करण्याचे प्रशिक्षण विद्यार्थांना दिले.

१५० पालकांनीही घेतला सहभाग माईलस्टोन इंटरनॅशनल स्कूल चे संचालक ज्ञानेश्वर तांबे यांच्या संकल्पनेतून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यासाठी त्यांनी आयोजित केलेल्या या कार्यशाळेत विद्यार्थ्यांबरोबर १५० पालकांनीही सहभाग घेत त्यांनी मुलांबरोबर पर्यावरण पूरक गणेशमूर्ती तयार केल्या. ७ वर्षापासून सातत्याने उपक्रम माईलस्टोन इंटरनॅशनल स्कूल च्या वतीने मागील ७ वर्षांपासून सातत्याने पर्यावरण संवर्धनासाठी कार्यशाळेचे आयोजन केले जाते. यंदा तब्बल ६०० विद्यार्थी पर्यावरण पूरक गणपती उत्सव साजरा करणार आहेत. पर्यावरण जागृतीचा संदेश यातून देण्यासाठी कार्यशाळा आयोजित केली होती. ती यशस्वी झाली. - सारिका जगताप, मुख्याध्यापिका

# मराठा आरक्षणाच्या निर्णय लढाईत मोठ्या संख्येने सहभागी व्हा : दत्ता शेळके

**बीड । प्रतिनिधी**



गेली अनेक वर्षापासून मराठा आरक्षणाचा लढा आज निर्णायक टप्प्यावर पोहोचलेला असून मनोज दादा जरांगे पाटील यांच्या नेतृत्वात दिनांक २९ ऑगस्ट २०२५ रोजी लाखो मराठा बांधव मराठा आरक्षणाच्या या ऐतिहासिक लढाईत सहभागी होणार असून आपण देखील मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन दत्ता शेळके पाटील यांनी केले आहे मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वात मागील दोन वर्षापासून मराठा आरक्षण लढाई अधिक तीव्र झालेली असून गेली चाळीस वर्षापासून हा लढा हा शेवटच्या टप्प्यात २९ ऑगस्ट रोजी राजधानी मुंबई येथे धडकणार असून आरक्षण घेतल्याशिवाय आता मुंबई सोडायची नाही असा ठोस निर्णय करूनच आता कधीच नाही याप्रमाणे आपण सर्व मराठे ताकतीने या आरक्षणाच्या ऐतिहासिक लढाईत साक्षीदार होऊया सर्व मराठा बांधवांनी म ोठ्या संख्येने या लढाईत सहभागी होऊया असे आव्हान दत्ता शेळके पाटील यांनी केले आहे

दैनिक मराठवाडा पत्र दि. २८/०८/२०२५

**टी.सी. हरवला आहे.**

**बनशिराज सचिन बागडे** या नावाचा इयत्ता १० वी पासाचा टी. सी. बस. प्रवासात हरवला आहे. कोणाला सापडल्यास संपर्क- मो. नं. ९९७५९ १५८८१ साधावा योग्य बक्षीस दिले जाईल.

दैनिक
# मराठवाडा पत्र
महाराष्ट्राचा बुलंद आवाज
• छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर
• संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे • जिल्हा विशेष • गुरूवार, दि. २८ ऑगस्ट २०२५ • पान ४


बीड: आनंदग्राम येथे प्रत्येक्ष वटवृक्षात गणपती बप्पा विराजमान


बीड धोंडीपुरा भागात सुभाष रोड या ठिकाणी मनमोहक आशा महालक्ष्मी चे मुखवटे बाजारामध्ये विक्रीसाठी आलेले आहेत. रविवारी महालक्ष्म्यांचे आगमन होत आहे.

गणपती बाप्पा मोरयाच्या गजरात श्री गणरायाचे वडवणीत घरोघरी आगमन

## बाप्पाच्या जयघोषात वडवणी दुमदुमली..!



**वडवणी । प्रतिनिधी**

गणपती बाप्पा मोरया, मंगलमूर्ती मोरया' च्या जयघोषात गुलालाची उधळण अन् डोल-ताशांच्या गजरात वडवणीकरांचे पाहुणचार स्वीकारण्यासाठी लाडक्या गणपती बाप्पांचे आगमन झाले आहे. बाप्पांना घरी घेऊन जाण्यासाठी गणेश भक्तांनी एकच गर्दी केली. गणरायाच्या स्वागताने गणेशभक्त भारावून गेले. गणेशोत्साला सुरुवात झाल्याने वातावरणात चैतन्य संचारले अवघे शहर गणेशमय झाले होते घरोघरी श्रींची प्रतिष्ठापना करण्यात आली सार्वजनिक गणेश मंडळांच्या मूर्तींची प्राणप्रतिष्ठापना सायंकाळी उशिरापर्यंत ▶ उर्वरित पान २ वर

## आष्टी येथे अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी न्यायालय स्थापन करण्यासाठी राज्यमंत्रिमंडळात मान्यता

### • आ.सुरेश धस यांच्या पाठपुराव्याला यश

**आष्टी । प्रतिनिधी**

राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत आष्टी येथे दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर) तथा अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी न्यायालय स्थापन करण्याचा ऐतिहासिक निर्णय आज घेण्यात आला.हे न्यायालय व्हावे म्हणून आमदार सुरेश धस हे सतत पाठपुरावा करत



असल्याने त्यांचा पाठपुराव्याला आज यश आले आहे.राज्य मंत्रिमंडळाने घोषणा करताच आष्टी तालुका वकील संघ व नागरिकांनी पेढे वाटून आनंद साजरा केला. राज्य सरकारच्या या निर्णयामुळे आष्टी तालुक्यातील जनतेला मोठा दिलासा मिळणार आहे.आतापर्यंत तालुक्यातील नागरिकांना बीडपर्यंत तब्बल ८२ किलोम ीटरचा प्रवास करून न्यायालयीन ▶ उर्वरित पान २ वर


मुंबईला जाणाऱ्या मराठा बांधवांसाठी साष्ट पिंपळगावात जोरदार तयारी....५० कुंटल तिखट पुरी तयार.

## महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतील करोडोचा भ्रष्टाचार: कृष्ण पाटोळे

### जिल्हाधिकारी कार्यालयासमोर या प्रकरणी आमरण उपोषण सुरू

**बीड । प्रतिनिधी**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतील भ्रष्टाचाराचा हा प्रकरण अत्यंत गंभीर व चिंताजनक आहे. योजनेअंतर्गत फळबाग लागवडीतून मोठ्या प्रमाणात अनियमितता घटित झाल्याच्या तक्रारींची चौकशी होत नसल्याचे दिसते. जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण सुरू करण्याचा निर्णय हा त्या लोकांच्या दुर्दशेबद्दलचा प्रतिघात आहे, ज्यांना या योजनेच्या माध्यमातून आर्थिक मदतीची अपेक्षा होती.या प्रकरणात, चौकशी समितीला दबाव आणण्यात आले



असल्याची तक्रार देखील आहे, ज्यामुळे चौकशी प्रक्रियेला अपाय झाला आहे. विशेषतः, संबंधित अधिकाऱ्यांनी तोंडी नकार दिला आहे, जेणेकरून हे प्रकरण दबवले जाईल. हे सर्व उपाययोजना आणि गटविकास अधिकाऱ्यांचे आदेश यांचे उल्लंघन आहे, ज्यामुळे भ्रष्टाचाराची संधी वाढली आहे.यामध्ये पुढील मुद्दे लक्षात घेणे आवश्यक आहे. चौकशी समितीतील सदस्यांनी चौकशी न करण्याचा निर्णय घेतल्यास, त्यांच्यावर कार्यवाही केली पाहिजे. राजकीय दबावामुळे असे वाटते की अधिकारी व कर्मचारी तक्रारदारांना गप करायला प्रवृत्त करीत आहेत, ज्यामुळे न्याय मिळविण्यात अडथळा,गटविकास अधिकारी व जिल्हाधिकारी यांच्याकडून तात्काळ कारवाईची आवश्यकता आहे. अन्यथा, उपोषणामुळे जनतेमध्ये असंतोष वाढू शकतो. सुरक्षेचा प्रश्न तक्रारदाराच्या सुरक्षिततेचा प्रश्न देखील महत्त्वाचा आहे, त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांना या प्रकरणाची गंभीरतेने घेतले पाहिजे. योजना प्रभावीपणे कार्यान्वित व्हावी आणि लाभार्थ्यांना न्याय मिळावा यासाठी संबंधित अधिकाऱ्यांनी तात्काळ आणि ठोस निर्णय घेतले पाहिजेत.

## ना.पंकजाताईंच्या आदेशाने शेतकरी कुटुंबातील गणेश लांडे यांची भाजपा जिल्हा सरचिटणीस पदी निवड



**बीड । प्रतिनिधी**

शेतकरी कुटुंबातून राजकारणात सक्रिय असलेल्या गणेश लांडे यांची नुकतीच भाजपा बीड जिल्हा सरचिटणीस पदी निवड झाली आहे. पक्षातील महत्त्वाच्या पदावर एका तरुण कार्यकर्त्याची झालेली ही निवड चर्चेचा विषय ठरत आहे. गणेश लांडे यांना त्यांच्या शेतात खत पेरत असतानाच या निवडीची बातमी मिळाली. शेतातील कष्टाचे घामाचे थेंब आज माझ्यासाठी अभिमानाचे सोने ठरले, अशा भावना त्यांनी व्यक्त केल्या. साम ान्य कार्यकर्त्यांना आणि सामान्य कुटुंबातून आलेल्या तरुणांना संधी देण्याची परंपरा स्वर्गीय गोपीनाथ मुंडे साहेबांनी निर्माण केली. त्याच परंपरेतून लोकनेत्या ना. पंकजाताई मुंडे यांनी ही जबाबदारी लांडे यांच्यावर सोपवली असून, त्यांना माजी खासदार प्रीतमताई मुंडे यांचेही मार्गदर्शन लाभत आहे.

भारतीय जनता पक्ष हा जगातील सर्वात मोठा पक्ष असून त्याच्या जिल्हा सरचिटणीस पदावर संधी ▶ उर्वरित पान २ वर

### जिव्हाळ्यातील लक्ष्मी बाई गिरी यांचे निधन



**बीड । प्रतिनिधी**

जिव्हाळा बेघर निवारा केंद्रामध्ये मागील सहा महिन्यापूर्वी आलेल्या या लक्ष्मीबाई गिरी, राहणार जामखेड. या आजीबाईचे दिनांक २७/०८/२५ रोजी जाम खेड ▶ उर्वरित पान २ वर

## मंत्रीमंडळ बैठकीत टाकळगाव बॅरेजच्या कामास मंजुरी, आ. विजयसिंह पंडित यांच्या पाठपुराव्याला यश

### निवडणूक प्रचारात दिलेला 'शब्द ' अमरसिंह पंडित यांनी पाळला

**गेवराई । प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकी दरम्यान सिंदफणा नदीवरील टाकळगाव कोल्हापूरी पध्दतीच्या बंधाऱ्याचे बॅरेजमध्ये रुपांतर करण्याचे काम करू असा ' शब्द' अमरसिंह पंडित यांनी दिला होता. त्यांनी दिलेला शब्द या माध्यमातून पाळला आहे. आमदार म्हणून निवडून



आल्यानंतर विजयसिंह पंडित यांनी केलेल्या पाठपुराव्याला यश आले असून मंत्रीमंडळ बैठकीत टाकळगाव बॅरेजच्या काम ास मंजुरी देण्यात आली आहे. त्यामुळे सिंदफणा काठावरील सिंचन क्षेत्रात भरीव वाढ होणार असुन पालकमंत्री ना अजित दादा पवार ▶ उर्वरित पान २ वर

### सरपंच रुद्रा कदम यांचे कडून साखर वाटून आनंद व्यक्त

सिंदफणा नदीपात्रात टाकळगाव येथे नवीन बॅरेजचे काम मंजुर झाल्याबद्दल टाकळगाव ग्राम पंचायतीचे सरपंच रुद्रा कदम व त्यांच्या सहकाऱ्यांनी गावात डफडे वाजवून साखर वाटप करत आनंद व्यक्त केला. त्यांनी जय भवानी सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अमरसिंह पंडित आणि आ विजयसिंह पंडित यांचे आभार मानले. ग्रामस्थ आणि शेतकरी यांनी राज्य मंत्रिमंडळाच्या निर्णयाचे स्वागत केले आहे.


महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या प्रदेश प्रवक्ते पदी निवड झाल्याबद्दल मा.मेहबूब भाई शेख यांचा सत्कार करताना जिवन जोगदंड, अशोक सुखवसे, शिवराज बांगर,भागवत मस्के, संदिप डोके.

# पुराच्या पाण्यात वाहून गेलेल्या आमेर अजमेर पठाणच्या कुटुंबियांना धनंजय मुंडे यांच्या प्रयत्नातून प्रशासनाकडून चार लाखांची मदत



### युवक नेते अजय मुंडे, तहसीलदार यांच्यासह पदाधिकाऱ्यांच्या हस्ते कुटुंबीयांना मदतीचा धनादेश प्रदान

**परळी वै. । प्रतिनिधी**

परळी वैद्यनाथ तालुक्यातील पांगरी परिसरातील पुलाच्या कामावर असताना परळी शहरातील कामगार आमेर अजमेर पठाण या तरुणाचा पुराच्या पाण्यात वाहून जाऊन मृत्यू झाला होता; परळीचे आमदार धनंजय मुंडे यांच्या प्रयत्नातून सदर तरुणाच्या कुटुंबीयांना आज प्रशासनाच्या वतीने चार लाख रुपयांच्या मदतीचा धनादेश सुपूर्द करण्यात आला. राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे युवक नेते तथा जिल्हा परिषदेचे माजी गटनेते अजय मुंडे यांच्यासह परळीचे तहसीलदार व्यंकटेश मुंडे यांच्या हस्ते या चार लाखांच्या धनादेशाचे वितरण पठाण यांच्या वारसांकडे करण्यात आले.

धनंजय मुंडे यांनी आपत्ती व्यवस्थापन मधून मयत कामगाराच्या वारसांना आर्थिक साहाय्य करण्याचे निर्देश तहसीलदार तथा स्थानिक प्रशासनास दिले होते त्या अनुषंगाने ही मदत तातडीने करण्यात आली. याप्रसंगी युवक नेते अजय मुंडे, तहसीलदार व्यंकटेश मुंडे, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे शहराध्यक्ष बाजीराव भैय्या धर्माधिकारी, माजी उपनगराध्यक्ष आयुब भाई पठाण, अजीज कच्ची, रवी मुळे, अल्ताफ पठाण, नय्युम शहा, राजू भाई, बद्दल भाई, स्थानिक चे तलाठी विष्णू गीते, खाजाभाई, जफर भाई, बकश भाई, अन्सारी सर यांसह पदाधिकारी आदी उपस्थित होते.